वर्ष : ०४ | अंक: १६ | मुंबई, मंगळवार १३ मार्च २०१८ ते १९ मार्च २०१८ | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 काँग्रेस पुन्हा सत्तेवर येईलच - सोनिया गांधी

3 → सामान्य व किरकोळ

बलात्कार केल्यास फाशी, राजस्थानात नवा कायदा मंजूर ← 4

# शेतकऱ्यांच्या ८० टक्के मागण्या मान्य



- वन जमिनीबाबत सहा महिन्यांच्या आत निर्णय घेणार
- जीर्ण झालेले रेशन कार्ड तीन ते सहा महिन्यात बदलून देणार
- आदिवासी भागात रेशन कार्ड ३ महिन्यात बदलून मिळणार
- अन्य भागत सहा महिन्यात मिळणार
- वन हक्क कायद्याखलील अपात्र दावे पुढच्या ६ महिन्यात निकाली करणार
- अपात्र प्रकरणे पुन्हा तपासू
- २००६ पूर्वी जितकी जागा असेल ती परत देऊ
- गहाळ झाल्याचा पुरावा असेल तर तो ही ग्राहय धरू

**मुंबई-** तब्बल २०० किलोमीटरची पायपीट करुन नाशिकवरुन मुंबईत धडकलेल्या शेतकऱ्यांच्या लयाला यश येताना दिसत आहे. कारण मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या शेतकरी नेत्यांच्या बैठकीत, शेतकऱ्यांच्या ८० टक्के मागण्या मान्य केल्याचा दावा, राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी केला. ते एबीपी माझाशी बोलत होते. वनजमिनीबाबत येत्या ६ महिन्यात निर्णय घेतला जाईल. त्यासाठी मंत्र्यांच्या समितीची स्थापना करण्यात येईल. ही समिती त्याबाबत पाठपुरावा करेल, ही मुख्य मागणी शेतकऱ्यांची होती. रक्ताळलेले पाय घेऊन २०० किलोमीटरची पायपीट केलेला बळीराजा अखेर आझाद मैदानावर धडकला. विविध मागण्यांसाठी नाशिकहून मुंबईकडे पायी निघालेला किसान सभेचा मोर्चा आज पहाटे आझाद मैदानात दाखल झाला.संपूर्ण कर्जमाफी, शेतमालाला भाव, वनजमिनींचं हस्तांतरण अशा मागण्या मान्य केल्याशिवाय आता मुंबई सोडणार नाही, अशी गर्जना शेतकऱ्यांनी केली आहे. खरंतर आज सकाळी ठाण्याहून मोर्चा मुंबईकडे निघणार होता, मात्र दहावी-बारावीच्या परीक्षार्थींना त्रास होऊ नये यासाठी शेतकऱ्यांनी त्रास सोसत रात्रीच आझाद मैदान गाठलं. सरकार आणि शेतकऱ्यांमधील बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. या चर्चेतून शेतकऱ्यांचं समाधान झालं आहे. त्यामुळे हे आंदोलन लवकरच मागे घेतलं जाईल. शेतकऱ्यांच्या जवळपास ८० टक्के मागण्या मान्य झाल्या आहेत, अशी माहिती जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी एबीपी माझाला दिली.शेतकऱ्यांचं शिष्टमंडळ आणि सरकारचं प्रतिनिधी मंडळ यांच्या सुमारे तीन तास चर्चा झाली.




# भाजपमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर

## हिंमत असेल तर नगरसेवक पद रद्द करा





**भाईंदर- महासभेत मांडलेल्या प्रस्तावाच्या मतदानावेळी तटक्ष राहिल्याने माजी महापौर गीता जैन यांना नोटीस बजावण्यात आली. इतकेच नाही तर तत्काळ खुलासा करा, अन्यथा कारवाई करु, अशी धमकी दिली. यावर गीता जैन यांनीही तुमच्यात हिंमत असेल तर माझे नगरसेवकपद रद्द करुन दाखवाच, असे आव्हान भाजप आमदार नरेंद्र मेहता यांना दिली आहे. त्यामुळे भाजपमधील अंतर्गत वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.**

आमदार नरेंद्र मेहता आणि माजी महापौर तथा विद्यमान नगरसेविका गीता जैन यांच्यामधून विस्तवसुद्धा जात नाही. गीता जैन या स्वच्छ चारित्र्याच्या, तसेच राजकीय वारसा असलेल्या परिवारातील आहेत. अगामी विधानसभा निवडणुकीत मिरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघातून विद्यमान भाजप आमदार नरेंद्र मेहता यांच्या प्रतिस्पर्धी अशी त्यांची ओळख आहे. त्यामुळे त्यांच्याविरोधात भाईंदरमधून मेहता गट नेहमीच कटकारस्थान करत असल्याचा आरोप होतो. २० फेब्रुवारी

उर्वरित पृष्ठ 2 वर

# शेतकऱ्यांचा आक्रोश सरकारला बेचिराख केल्याशिवाय राहणार नाही, शिवसेनेचा इशारा




**मुंबई - आपल्या विविध मागण्यांसाठी शेतकऱ्यांचा लाँग मार्च सोमवारी पहाटेच्या सुमारास मुंबईतील आझाद मैदानावर दाखल झाला. भाजपा वगळता शिवसेनेसह सर्वच पक्षांनी शेतकऱ्यांच्या या मोर्चाला पाठिंबा दिला आहे.**

आपल्या विविध मागण्यांसाठी शेतकऱ्यांचा लाँग मार्च सोमवारी पहाटेच्या सुमारास मुंबईतील आझाद मैदानावर दाखल झाला. भाजपा वगळता शिवसेनेसह सर्वच पक्षांनी शेतकऱ्यांच्या या मोर्चाला पाठिंबा दिला आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून शिवसेनेने पुन्हा एकदा भाजपावर टीकास्त्र सोडले आहे. सरकारने अर्थसंकल्पात फसव्या घोषणा करून शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळले असून धुळ्याचे एक शेतकरी धर्मा पाटील मंत्रालयात आले व त्यांनी आत्महत्या केली. आता 'जय किसान'चा नारा देत हजारो धर्मा पाटील मंत्रालयाच्या दिशेने निघाले आहेत. त्यांचा आक्रोश आणि वेदना सरकारला बेचिराख केल्याशिवाय राहणार नाहीत, असा इशारा शिवसेनेने दिला आहे. तसेच सरकार पोलीस यंत्रणेचा कठोर वापर करून शेतकऱ्यांना आझाद मैदान किंवा काळा घोड्याची वेसही ओलांडून देणार नाही. त्यांना रोखण्यासाठी लोखंडी जाळ्या, दंडुके, अश्रुधुराची नळकांडी याचा बंदोबस्त केला असून पोलिसांची कुमकही वाढवली अशी शंकाही उपस्थित केली.

शिवसेनेने 'सामना' या आपल्या मुखपत्रातून भाजपावर टीकास्त्र सोडले. मोर्चेकऱ्यांना भुलवण्यासाठी सरकार एखाद्या मंत्र्यास पाठवेल आणि खोटी आश्वासने देऊन शेतकऱ्यांचा जोष कमी करेल. पण हा शेतकरी आता कोणत्याही भूलथापांना बळी पडणार नसल्याचा विश्वासही व्यक्त केला. हा मोर्चा कोणत्या विचारांचा, संघटनेचा किंवा रंगाचा या चर्चेत पडायचे नसून तो शेतकरी आहे. त्याला जात, धर्म व राजकीय विचार नाही, असे म्हणत आम्ही त्यांचे मुंबई स्वागत करतो, अशी भूमिका सेनेने मांडली.

कम्युनिस्टांच्या मोर्चाला शिवसेनेने पाठिंबा दिल्यामुळे सध्या तो चर्चेचा विषय ठरला आहे. त्यावरही भाष्य करताना शिवसेनेने आपली भूमिका स्पष्ट केली. मतभेद असले तरी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात लाल निशाण सक्रियपणे सहभागी होते, हे विसरता येणार नाही. सर्व राजकीय मतभेद दूर ठेवून आम्ही शेतकऱ्यांच्या मागण्यांना पाठिंबा देत आहोत. शेतकरी पिचला आहे, रोज आत्महत्या करतो आहे. रोज नवे संकट त्यांच्यासमोर उभे ठाकत आहे. अशा शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करून त्यांचा सातबारा कोरा करा ही पहिली मागणी शिवसेनेची. त्यासाठी आम्ही रान पेटवले व सरकार गदागदा हलवले तेव्हा सरकारने कर्जमुक्तीची घोषणा केली, पण ही कर्जमुक्ती फसवी आहे. हजारो, लाखो शेतकरी कर्जमुक्तीच्या लाभापासून वंचित आहेत. कर्जमाफीतून शेतकऱ्यांच्या हाती फारसे काही लागले नाही व राजकीय लाभासाठी फक्त जाहिरातबाजी झाली. सरकारी धोरणे व नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी हतबल झाला आहे. सरकार फक्त तोंडाला पाने पुसत आहे. अर्थसंकल्पात शेतकऱ्यांच्या नावाने फक्त घोषणांची बोंब मारण्यात आली. ना कर्जमाफी ना नुकसान भरपाई. शेतकरी मोठ्या संख्येने आत्महत्येच्या मार्गावरून निघाला आहे व त्याने क्रांतीची ठिणगीच टाकली आहे, असे म्हणत भाजपाला लक्ष्य केले.

# तामिळनाडूतील वणव्यात ३६ गिर्यारोहक अडकले



**थेनी : तामिळनाडूतील थेनी जिल्ह्यातील कुरंगनी हिल्स येथील जंगलात लागलेल्या वणव्यात रविवारी ३६ विद्यार्थी अडकले. त्यातील १५ जणांना सोडवण्यात यश आल्याची माहिती स्थानिक अधिकाऱ्यांनी दिली.**

थेनी जिल्ह्यातील कुरंगनी येथील जंगलात कोईमतूर आणि इरोडे येथून सुमारे ३६ विद्यार्थी गिर्यारोहणाचे प्रशिक्षण घेण्यासाठी गेले होते. तेथून परतत असताना जंगलात अचानक लागलेल्या आगीमुळे हे विद्यार्थी अडकून पडले. स्थानिक आदिवासी, पोलीस आणि बचाव पथकांच्या मदतीने त्यातील १५ जणांना वाचवण्यात यश आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

अन्य विद्यार्थ्यांच्या सुटकेसाठी राज्याचे मुख्यमंत्री के. पलानीस्वामी यांनी संरक्षणमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे मदतीची मागणी केली. सीतारामन यांनी हवाई दलाच्या दक्षिण मुख्यालयाला मदतीसाठी सूचना दिल्या. हवाई दलाच्या सुलूर येथील तळावरून दोन हेलिकॉप्टर घटनास्थळी रवाना करण्यात येत असल्याचे सीतारामन यांनी ट्वीटद्वारे जाहीर केले. तसेच हवाई दलाच्या दक्षिण मुख्यालयाकडून थेनी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

## सौजन्य व्हॉट्सअप




# उद्योजक साम्राज्य आयोजित व्यावसायिक विकास कार्यशाळेचे आयोजन



१० मार्च २०१८ रोजी, विलेपार्ले, मुंबई येथे मुंबई परिसरातील लोकांसाठी एक उद्योजक विकास मेळावा भरविण्यात आला. ह्या कार्यक्रमाचे मुख्य सूत्रधार श्री संजय लाड आणि श्री हेमंत वडिया हे होते. या कार्यक्रमात वेगवेगळ्या क्षेत्रातील जवळपास ३०० पेक्षा जास्त प्रशिक्षक, उद्योजक, व्यावसायिक आणि वितरक यांनी सहभाग घेतला. उद्योजकांना एकत्र आणून त्यांना वेगवेगळ्या बाबींचे प्रशिक्षण देऊन यशाच्या मार्गावर घेऊन जाणे हा ह्या कार्यक्रमाचा मुख्य उद्धेश होता. ह्या कार्यक्रमात व्यवसाय व्यवस्थापन, विक्री कौशल्य, आधुनिक जाहिरात, मनाची शक्ती, डिजिटल मार्केटिंग, सोशल मीडिया मार्केटिंग ह्या विषयांवर मार्केटिंग एक्स्पर्ट श्री संजय लाड, मोटिव्हेशनल गुरु श्री दीपक शिंदे, मीडिया गुरु श्री हेमंत वडिया, आध्यत्मिक गुरु श्री आर सी जैन साहेब यांचे अमूल्य मार्गदर्शन उपस्थितांना लाभले. यशस्वी उद्योजक व समाज कल्याणकारी श्री दीपक मोरेश्वर नाईक,

उर्वरित पृष्ठ 2 वर

# तुमच्या ताटातील चिकन सुरक्षित आहे काय?

**मुंबई- भेसळयुक्त फळभाज्या तसेच खाद्यपदार्थ रोखण्यासाठी तपासयंत्रणा नसल्याने मुंबई शहरात मिळणारे चिकन तरी सुरक्षित आहे का, असा सवाल उच्च न्यायालयाने उपस्थित करीत हे चिकन पुरविणाऱ्या पोल्ट्रीफार्ममधील कोंबड्यांचे योग्यप्रकारे लसीकरण आणि त्यांची तपासणी होते की नाही, जंक फूडची तपासणी होते का, आदी प्रश्नाचा भडीमार न्यायमूर्ती नरेश पाटील आणि न्यायमूर्ती अनुजा प्रभुदेसाई यांच्या खंडपीठाने केला.**

सिटीझन सर्कल फॉर वेलफेअर ॲण्ड एज्युकेशन या संस्थेने विषारी कीटकनाशकांमुळे यवतमाळमध्ये शेतकऱ्यांच्या झालेल्या मृत्यूच्या मुद्द्यावर विषारी कीटकनाशकांमुळे आणि भेसळयुक्त अन्नपदार्थांमुळे लोकांचे आरोग्य धोक्यात येत आहे असा आरोप करणारी जनहित याचिका उच्च न्यायालयात दाखल केली आहे. त्या याचिकेवर न्यायमूर्ती नरेश पाटील आणि न्यायमूर्ती अनुजा प्रभुदेसाई यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने सध्या सुरू असलेल्या मॉल संस्कृतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

दिवसेंदिवस मॉल संस्कृती वाढत आहे. लोक मॉलमधून चकाकणारी फळे, पालेभाज्या तसेच फ्रोजन मांसमच्छी विकत घेतात. तर लहान मुले सध्या जंक फुडचा जमान्यात



वावरत आहेत. हे जंकफूड लहान मुलांच्या खाण्यासाठी योग्य आहे का? फ्रोझन फुडची एक्सपायरी डेट पाहिली जाते का? इथले इतर खाद्यपदार्थही खाण्यायोग्य आहेत का? त्याची तपासणी होते का? असे अनेक प्रश्न उपस्थित करून त्याची तपासणी होते का अशी विचारणाही राज्य सरकारकडे केली. या सर्वाचा विचार करून राज्य सरकारने यासंदर्भात जनजागृती करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करून राज्याच्या सूचना आणि प्रसारण खात्यातर्फे सार्वजनिक ठिकाणे, थिएटर्स, मॉल्स इत्यादी ठिकाणी जाहिरात करण्याबाबत विचार करावा, असे मत व्यक्त केले. उच्च न्यायालयाने यासंदर्भात राज्य सरकारला योग्य ती पावले उचलून दोन आठवड्यांत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले.

## मुंबई विमानतळ दर्जेदार सेवा देण्यात जगात नंबर १



**मुंबई-** सर्वाधिक प्रवाशांना दर्जेदार सेवा देण्याच्या बाबतीत मुंबई छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ जगात नंबर १ ठरले आहे. एअरपोर्टस् कौन्सिल इंटरनॅशनलने (एसीआय) जगभरातील विमानतळांचे सर्वेक्षण करून ही क्रमवारी दिली आहे. वर्षाला चार कोटींपेक्षा अधिक प्रवासी मुंबई विमानतळावरून प्रवास करतात. मुंबईचे छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि दिल्ली येथील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ ही दोन्ही विमानतळे सर्वाधिक प्रवाशांना सेवा देण्यात जगात अव्वल ठरली आहेत.

तर २०१७ या वर्षात दीड कोटी प्रवाशांना सेवा देऊन हैदराबाद विमानतळही त्यांच्या पंक्तीत येऊन बसले आहे. एसीआयने केलेल्या सर्वेक्षणात जगभरातील विमानतळांवर प्रवाशांची मते जाणून घेतली. विमानतळावरील प्रवेश, सुरक्षाव्यवस्था, रेस्टरूम्स, रेस्टॉरंटस् आदी ३४ सेवांबाबत प्रवाशांकडून माहिती घेतली गेली. दिल्ली विमानतळ हे या सर्वेक्षणात जगातील सर्वाधिक व्यस्त २० विमानतळांमध्ये सातवे विमानतळ ठरले.

## कलागुण जपले तर ताण कमी होतो



आजच्या महिला घर आणि नोकरी यांची जबाबदारी समर्थपणे पार पाडतात. पण असे करत असताना स्वतःच्या आवडी निवडीस विसरुन जातात. पण आपली आवड आणि कलागुण जपले तर आपल्या मन आणि शरीरावरील ताण कमी होण्यास मदत होते, असे मत अमृता फडणवीस यांनी व्यक्त केले. जागतिक महिला दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाअंतर्गत दुर्गा महिला मंचाच्यावतीने गुरुवारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अमृता फडणवीस या उपस्थित होत्या. महिलांनी आपली आवड आणि कलागूण जपले तर मनावरील आणि शरीरावरील ताण कमी होतो. आपण हाती घेतलेले जे काम आहे त्यात शंभर टक्के प्रयत्न केल्यास यश नक्की मिळते, असे त्यांनी म्हटले आहे. या कार्यक्रमात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर या देखील उपस्थित होत्या. राज्यातील सर्व कारागृहांमध्ये सॅनिटरी वेन्डिंग मशीन आणि शाळांमध्ये आरोग्य रक्षक पेढीसाठी महिला आयोगातर्फे पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

## काँग्रेस पुन्हा सत्तेवर येईलच - सोनिया गांधी

**मुंबई** - भाजपच्या 'अच्छे दिन'ची अवस्था 'इंडिया शायनिंग'सारखीच होईल आणि पुढील वर्षी काँग्रेस पुन्हा सत्तेवर येईल असे प्रतिपादन सोनिया गांधी यांनी शुक्रवारी येथे केले. नरेंद्र मोदी सरकारकडून प्रक्षोभक विधाने केली जात असून, त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही, असेही त्या म्हणाल्या.

देशात २०१४ सालापर्यंत काही विकास झाला नाही, सारी प्रगती गेल्या चार वर्षांतच झाली, असा प्रचार सुरू असून, असे करणे हा नेते, बुद्धिवंत अशा



सा-यांचा अपमानच आहे, अशी टीका त्यांनी केली. एका कार्यक्रमात त्या म्हणाल्या की, राज्यघटना बदलण्याबाबत विधाने केली जात असून, यामागे देशाचे विविधतेतून एकता हे रूप बदलण्याचा कुटील डाव आहे. आधार हे सबलीकरणाचे महत्त्वाचे साधन आहे. मात्र मोदी सरकार आधारद्वारे जनतेवर नियंत्रणे आणू पाहत आहे. भ्रष्टाचारविरोध व पारदर्शक कारभारासाठी माहिती अधिकार कायदा आणला.

मात्र मोदी सरकारने तो शीतपेटीत टाकून दिला आहे. समविचारी पक्षांनी एकत्र यावे भाजपच्या पराभवासाठी समविचारी पक्षांनी एकत्र यावे. त्यासाठी स्थानिक मतभेद विसरणे आवश्यक आहे असे सांगून त्या म्हणाल्या की, स्वार्थी राजकीय हेतूंसाठी केंद्र सरकारच हिंसाचारास प्रोत्साहन देत आहे.

## मनसेची 'तपपूर्ती'; राज ठाकरे पाडव्याच्या मुहूर्तावर जाहीर करणार 'इंजिना'ची पुढची दिशा

**मुंबई-** गेली १२ वर्षं मराठी माणूस, भूमिपुत्र, मराठी भाषा हे प्रमुख मुद्दे घेऊन लढणाऱ्या आणि 'खळ्ळ-खटॅक'साठी ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा पुढचा अजेंडा काय असेल, त्यांचं 'इंजिन' कुठल्या दिशेनं पुढे जाईल, हे पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर जाहीर करणार आहेत. मनसेच्या स्थापनेला आज १२ वर्षं पूर्ण झाली. त्यानिमित्त आयोजित वर्धापनदिन सोहळ्यात राज ठाकरे यांनी मनसेच्या सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात केली, पण कुठलंही राजकीय भाष्य केलं नाही. १८ तारखेला, गुढीपाडव्याच्या दिवशी शिवाजी पार्कवर होणाऱ्या सभेत मी माझं म्हणणं मांडेन, असं राज यांनी स्पष्ट केलं. १८ तारखेला मी बोलणार असल्याने बाजारातून मेणबत्त्या आणून ठेवा. अनेक ठिकाणी माझ्या सभेच्या वेळी वीज घालवण्याचे धंदे सुरू होतात. पण, यावेळी दिवे घालवणाऱ्या



अधिकाऱ्यांशी आधी बोलून ठेवा. सभा सुरू असताना अशा काही गोष्टी केल्या तर त्यांना तुडवा. कारण, इतर पक्षांच्या दबावाला बळी पडून वीज घालवणार असतील तर त्यांना हिसका दाखवणं गरजेचं आहे, असे आदेश त्यांनी मनसैनिकांना दिले.

## अर्थमंत्र्यांनी सातव्या वेतन आयोगासंदर्भातही हीच 'माया' केली असती तर न्याय्य ठरलं असतं - उद्धव ठाकरेंचा टोला

**मुंबई-** वित्तमंत्री मुनगंटीवार यांनी सलग चौथा अर्थसंकल्प सादर करताना शेरोशायरी करत विरोधकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांच्या पोतडीत फारसे नावीन्यपूर्ण काहीच नसल्यामुळे सर्वांचीच निराशा झाली. पुढील वर्षीच्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून विविध समाजातील महापुरुषांच्या स्मारकांसाठी निधी देऊन त्या-त्या समाजघटकांना खूश करण्याचा प्रयत्न केला गेला. राज्याच्या अर्थसंकल्पाबाबत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही सामना संपादकीयमधून भाष्य केले आहे. 'अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी अर्थसंकल्प मांडताना चमकदार घोषणाबाजी केली नसेल, विरोधकांना चिमटे घेत शायरीची नेहमीची 'शेरो'बाजी केली असेल. आकड्यांचा तोच खेळ ते आता पुन्हा खेळले असतील, पण आहे त्या परिस्थितीचे भान ठेवत राज्याच्या आर्थिक चित्रात रंग भरण्याची कसरत त्यांनी केली असे म्हणता येईल', असं त्यांनी म्हटले आहे. शिवाय, 'मुंबई व इतर शहरांतील मेट्रो रेल्वे, समृद्धी महामार्ग, स्मार्ट अभियान, मॅग्नेटिक महाराष्ट्र, मेक इन इंडिया, स्टार्ट अप उद्योग यासारख्या सत्ताधाऱ्यांच्या 'लाडक्या' प्रकल्पांवर अर्थमंत्र्यांनी जास्त 'माया' केलेली दिसत आहे. फक्त हीच 'माया' त्यांनी सातव्या वेतन आयोगासंदर्भात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांवरही



केली असती तर अधिक बरे आणि न्याय्य ठरले असते', असा टोलादेखील त्यांनी हाणला आहे.

राज्याचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी शुक्रवारी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. महाराष्ट्राची वित्तीय तूट १५ हजार कोटींवर जाणे, राज्यावरील कर्जाचा डोंगर चार लाख कोटींपेक्षा मोठा होणे, विकासदर आणि कृषी उत्पादनात घसरण होणे अशा काही गंभीर गोष्टी गुरुवारी सादर करण्यात आलेल्या आर्थिक पाहणी अहवालात स्पष्ट झाल्या होत्याच. त्यावर मात करण्यासाठी सरकारला किती शर्थ करावी लागणार आहे हे यंदाचा 'तरतुदींचा अर्थसंकल्प' पाहता दिसून येते. आज जे विरोधक अर्थसंकल्पाबाबत उलट्या बोंबा मारीत आहेत त्यांच्या सत्ताकाळातील अर्थसंकल्प म्हणजे 'शिलकी'ने दुथडी भरून वाहणारी विकासाची गंगा होती आणि त्यावेळी राज्यावर कर्जाचा बोजा अजिबात नव्हता असे त्यांना म्हणायचे आहे का? किंबहुना परिस्थितीचे भान न ठेवता सलग १५ वर्षे राज्यकारभार केल्यानेच हा कर्जाचा डोंगर आज एवढा प्रचंड झाला आहे. तेव्हा परिस्थितीचा विचार करून त्यानुसार तरतुदींची 'पेरणी' करणे केव्हाही चांगले.

## गावठाणातील घरांना मिळणार संरक्षण - गोपाळ शेट्टी

**मुंबई-** गावठाणातील घरांना संरक्षण देण्याचे आदेश उपनगर पालक मंत्री तथा शालेय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे यांनी दिल्याची माहिती उत्तर मुंबईचे भाजपा खासदार गोपाळ शेट्टी यांनी दिली. येथील मच्छीमारांच्या समस्या सोडविण्यासाठी खासदार शेट्टी आणि मच्छीमारांच्या प्रतिनिधींनी मंत्री विनोद तावडे यांची भेट घेतली. गावठाण व कोळीवाड्यामधील सद्य:स्थितीत असलेल्या घरांना



संरक्षण देत स्थानिकांना राहती घरे दुरुस्त करणे व दुमजली करण्यासाठी कायदेशीर परवानग्या देण्यासाठी कारवाई करण्याच्या सूचना पालकमंत्री विनोद तावडे यांनी या वेळी दिल्या, अशी माहिती शेट्टी यांनी दिली.

या बैठकीला मत्स्यव्यवसाय मंत्री महादेव जानकर, भाजपा खासदार गोपाळ शेट्टी, भाजपा उत्तर मुंबई जिल्हा अध्यक्ष विनोद शेलार, महाराष्ट्र मच्छीमार संघर्ष समितीचे सरचिटणीस किरण कोळी, कोळी समाजाचे नेते सुनील कोळी, संजय सुतार, भाजपा उत्तर मुंबई उपाध्यक्ष युनूस खान आदी उपस्थित होते. खासदार शेट्टी यांनी सुचविल्याप्रमाणे, मेरीटाइम बोर्डाने स्थायी समितीमध्ये मंजूर झालेल्या प्रस्तावानुसार लवकरात लवकर पुलांचे सर्वेक्षण करून अहवाल महानगरपालिकेला देण्याबाबत पालकमंत्र्यांनी आदेश दिला आहे.

मढ, कोळीवाडा भागातील पाण्याचा दाब वाढविण्याकरिता पंप बसविण्यासाठी विलंब होत असल्यामुळे शेट्टी यांनी पंपाच्या संपूर्ण खर्चाची जबाबदारी घेत महापालिकेच्या मदतीने संपूर्ण मढ कोळीवाड्यात पाणीपुरवठा व्यवस्थेत सुधार करण्याचे आश्वासन दिले.

तळपशा बंदराच्या वेगवेगळ्या ठिकाणच्या समुद्रकिनाड्ढयांवरील मंजूर झालेल्या कामांची सुरुवात प्राधान्याने करण्यात येईल, असा आदेश महादेव जानकर यांनी प्रशासनास दिला.

## महापालिकांचा 'महावितरण'लाच शॉक

**मुंबई - मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पनवेल व उरण येथील विजेची कामे करताना महावितरणला रस्त्यांचे खोदकाम करावे लागते. खोदकाम करताना महावितरणला महापालिकांची परवानगी घ्यावी लागते, शिवाय खोदलेल्या रस्त्यांची नुकसानभरपाई म्हणूनही महावितरणला महापालिकांना खोदकाम शुल्क द्यावे लागते. मात्र, महापालिकांच्या खोदकामांच्या शुल्काचे दर अव्वाच्या सव्वा असून, अनेकदा खोदकामाच्या परवानगीबाबतचे निणर्य होत नाहीत. परिणामी, महावितरणची विजेची कामे ठप्प झाली आहेत.**

सध्या केंद्राकडून एकात्मिक ऊर्जा विकास प्रकल्प याअंतर्गत मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पनवेल व उरणसाठी १३० कोटींचा निधी प्राप्त झाला आहे. यामध्ये प्रामुख्याने नवीन दोन उपकेंद्र (१ बृहन्मुंबई महानगरपालिका व १ ठाणे महानगरपालिका), १ स्वीचिंग केंद्र (कल्याण-डोंबिवली महानगरपालिका), नवीन रोहित्र



बसवणे, रोहित्रांची क्षमता वाढवणे, भूमिगत उच्च व लघुदाब वाहिनी टाकणे, रिंग मेन युनिट बसवणे, फिडर पिलर बसवणे, अशी विविध कामे अंतर्भूत आहेत. मात्र, पालिकांच्या आडमुठ्या धोरणांमुळे ही कामे करणे महावितरणसाठी कठीण होत आहे. प्रत्यक्षात महावितरणला ही कामे करण्यासाठी स्थानिक नगरपरिषद, नगरपालिका अथवा महानगरपालिका यांच्याकडून खोदकाम करण्याची परवानगी घ्यावी लागते. खोदकाम केल्यानंतर तसेच भूमिगत वीज वाहिनी टाकल्यानंतर भरपाई म्हणून या स्थानिक संस्थांना भरपाई द्यावी लागते. आकारण्यात येणारा हा दर काही ठिकाणी अव्वाच्या सव्वा असल्यामुळे तर काही ठिकाणी निणर्य होऊनही प्रत्यक्ष पत्रक निघण्याची प्रक्रिया लांबल्यामुळे काम करणे शक्य होत नाही.

## राज्याच्या शेतीची प्रकृती नाजूक! कृषी उत्पादन घटले

मुंबई- शेतीच्या शाश्वत विकासासाठी दोन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केल्याचा दावा सरकार करत असले तरी गतवर्षीच्या तुलनेत कृषी उत्पादनात कमालीची घट झाली असून, शेतीची प्रकृती नाजूक असल्याचे वास्तव आर्थिक पाहणी अहवालातून समोर आले आहे. वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार राज्याचा अर्थसंकल्प मांडणार आहेत. यंदा केंद्रीय अर्थसंकल्पात अरुण जेटली यांनी कृषी व ग्रामीण विकासावर भर दिला होता.

----(पृष्ठ १ वरुन)----

## भाजपमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर

रोजी पार पडलेल्या पालिका महासभेत भाजपने मांडलेल्या दोन प्रस्तावावेळी झालेल्या मतदान प्रक्रियेत जैन तटस्थ राहिल्या होत्या. सध्या भाजपची सर्व सुत्रे आमदार नरेंद्र मेहता यांच्या हाती आहेत. त्यांचे एकदम खास आणि पालिका गटनेते हसमुख गेहलोत यांनी जैन यांना तटस्थ, राहिल्याबद्दल खुलासा करा, अन्यथा आपले नगरसेवकपद रद्द करण्यात येईल, अशी नोटीस बजावली आहे. याबद्दल गीता जैन यांना विचारले असता कोणात हिंमत असेल तर माझ्यावर कारवाई करुन दाखवावीच किंवा माझे नगरसेवक पद रद्द करुन दाखवावेच, माझे त्यांना आव्हान आहे, अशी रोखठोक प्रतिक्रिया त्यांनी दिली.

## उद्योजक साम्राज्य आयोजित व्यावसायिक विकास कार्यशाळेचे आयोजन

आघाडीचे उद्योजक श्री राजेंद्र सावंत, सामाजिसेवीका सौ. शिल्पा भावसार, जेष्ठ समाजसेविका सौ. वनिता पार्सेकर आणि उद्योग प्रशिक्षक सौ वंदना दराडे हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते.

गेल्या १० वर्षांपासून उद्योजकांच्या सर्वांगीण विकासासाठी उद्योग प्रशिक्षक श्री संजय लाड हे अहोरात्र प्रयत्नशील आहेत. त्यांच्या या सत्कार्याला मनाचा मुजरा.

## केंद्र सरकारला तब्बल ४ हजार कोटींचा फटका मुंबई लोकलचा 'डायरेक्ट करंट'

**मुंबई-** मुंबईची जीवनवाहिनी अशी ओळख असलेल्या उपनगरीय लोकलमुळं गेल्या तीन वर्षांमध्ये केंद्र सरकारला चार हजार कोंटी रुपयांचे नुकासान झाले आहे. काल बुधवारी लोकसभेत बोलताना रेल्वे राज्यमंत्री राएन गोहेन यांनी ही माहिती दिली. लोकसभेत बोलताना राएन गोहेन म्हणाले की, रेल्वेला उपनगरीय लोकल चालवण्यासाठी २०१४-१७ या तीन वर्षांमध्ये ४२८० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. २०१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मुंबईकरांचा प्रवास सुखकर करण्यासाठी तब्बल ४०हजार कोटींची तरतूद अर्थमंत्री अरुण जेटली यांनी केली होती. ७५ लाखांहून अधिक प्रवासी वहन करणा- या मुंबई उपनगरीय रेल्वेच्या विस्तारासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली होती. यात ९० किलोमीटर रेल्वेमार्गाचे दुपदरीकरण करण्यात येणार असून यासाठी ११ हजार कोटींचा निधी देण्यात आला



आहे. मुंबईमध्ये २,३४२ लोकल धावतात आणि यामधून ७५ लाखांपेक्षा आधिक लोक प्रवास करतात. राएन गोहेन यांनी संसदेत दिलेल्या माहितीनुसार, २०१४-१५मध्ये १४२६ कोटी, २०१५-१६मध्ये १४७७ कोटी आणि२०१६-१७मध्ये १३७६ कोटींचे नुकसान मुंबई लोकलमुळं रेल्वेला झालं आहे. उपनगरीय रेल्वे सेवा मुंबईची जीवनवाहिनी असल्याचे मानले जाते. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. देशातील बहुतांश सर्व मोठ्या उद्योगांची कार्यालये मुंबईत आहेत. औद्योगिक वसाहतीही शहरात आहेत. मुंबईचा विस्तार अफाट असल्यामुळे लोकांना दूरदूरच्या उपनगरात राहून कामासाठी मुंबईत यावे लागते. याकामी त्यांना उपनगरी रेल्वे सेवेचाच आधार आहे. लोक दोन-दोन तास प्रवास करून मुंबईत येतात. उपनगरीय रेल्वेचा विस्तार झाल्यास मुंबईकरांसाठी काही प्रमाणात सोयीचे होईल, असे जाणकारांना वाटते.

## शिक्षकांना सरकारी पंच नेमण्यास शिक्षक संघटनेचा विरोध

**मुंबई-** फौजदारी खटल्यामध्ये साक्षीदार फुटल्यामुळे व गुन्हा सिद्ध न झाल्यामुळे संशयित आरोपी सुटल्याची अनेक उदाहरणे आहेत. यासाठी सरकारी पंच




नेमण्यात येत आहेत. मात्र आता प्राथमिक शिक्षकांच्या सरकारी पंच म्हणून केलल्या नियुक्त्या रद्द करण्याची मागणी केली जात असून यापुढे शिक्षकांना सरकारी पंच नेमण्यास शिक्षक संघाने विरोध दर्शवला आहे. खून, बलात्कार आदी गंभीर गुन्ह्यांमध्ये आरोपी आरोपत्रातील व कायद्यातील पळवाटा काढून, साक्षीदार फुटल्यामुळे सुटू नये असे शासनाचे व न्यायमंडळाचे धोरण आहे. यासाठी विश्वासार्हता असणाऱ्या शासकीय नोकरदारांची गंभीर गुन्हयात नेमणूक करावी, यासाठी पोलिसांनी या कामी मागणी करताच त्या खातेप्रमुखांना पंच पुरवावे लागतात.अन्यथा खाते प्रमुखांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश आहेत. परीक्षेचा कालावधी असताना विविध गुन्ह्यंमध्ये सरकारी पंच म्हणून फलटण पोलीस ठाण्यात शिक्षकांना बोलावण्यात येत आहे. परंतु शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून जनगणना आणि निवडणूक या शिवाय कोणतेही अशैक्षणिक काम प्राथमिक शिक्षकांना देता येत नाही. पंचायत समितीच्या शिक्षण विभागातूनच शिक्षण हक्क कायद्याचे उल्लंघन केले जात आहे.

# संपादकीय... सामान्य व किरकोळ


संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

**महाराष्ट्राच्या कठीण आर्थिक स्थितीचा लेखाजोखा आर्थिक पाहणी अहवालातून समोर आल्यावर अर्थसंकल्पाबद्दल फार अपेक्षा नव्हत्या आणि तो अंदाज खरा ठरला. मुख्यमंत्री व अर्थमंत्र्यांच्या गप्पा मोठ्या असल्या तरी राज्याची अर्थस्थिती ही अभिमान वाटावा अशी राहिलेली नाही, हे वास्तव आहे. अर्थात याबद्दल मुख्यमंत्र्यांना दोष देता येणार नाही. दोष द्यायचा तर तो उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथ आणि पंतप्रधान मोदी यांना द्यावा लागेल. आदित्यनाथांनी कर्जमाफी देऊन टाकल्यानंतर भाजपच्या मुख्यमंत्र्यांची गोची झाली. कर्जमाफी तत्वत: मान्य असली तरी त्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करणे कठीण आहे ही जाणीव भाजपच्या सर्व मुख्यमंत्र्यांना होती. आदित्यनाथ यांना थांबविणे गरजेचे होते, पण मोदींनी ते केले नाही, कारण उत्तर प्रदेशच्या शेतकऱ्यांना आदित्यनाथ शब्द देऊन बसले होते. उत्तर प्रदेशची कर्जमाफी तशी किरकोळ होती व तेथील शेतकरीही कर्जमाफी मिळाल्यावर शांत झाले. मात्र महाराष्ट्रावर कित्येक हजार कोटींचा बोजा पडला आणि इतका बोजा उचलूनही शेतकरी वर्ग भाजपच्या बाजूने आला आहे असे नाही. दुसरा बोजा सातव्या वेतन आयोगाचा होता. केंद्राप्रमाणे राज्याला वेतन आयोग लागू करून मतांची बेगमी करण्याची धडपड केल्याने राज्याच्या तिजोरीला आणखी ग्रहण लागले. या दोन गोष्टींमुळे पन्नास हजार कोटींहून अधिक रकमेचा बोजा पडला आहे. हा बोजा नसता तर महसुली तूट आवाक्यात राहिली असती व नव्या योजनांसाठी पैसेही मिळाले असते. या दोन बोज्याखाली दबल्यामुळे मुख्यमंत्री व अर्थमंत्र्यांना विशेष वाव नव्हता.**

**तथापि, अशाच परिस्थितीत नेतृत्वाची कसोटी असते. अर्थसंकल्प हा सरकारचे व्यक्तिमत्व दाखवितो. अर्थसंकल्पातून जशी धोरणाची दिशा दिसते तशी किंवा त्याहून अधिक सरकारची इच्छाशक्ती दिसते. कोणत्या घटकांवर सरकारची भिस्त आहे व अर्थव्यवस्थेचे कोणते खांब सरकारला मजबूत करायचे आहेत, तसेच राज्याला कोणत्या दिशेने ठाम पावले टाकायला लावायची आहेत हे अर्थसंकल्पातून दिसते. पैसा कमी असला तरी काही धाडसी निणर्य घेता येतात. मुनगंटीवारांच्या अर्थसंकल्पात धाडस व इच्छाशक्तीचा अभाव दिसला. केंद्रीय अर्थसंकल्पाने 'आयुष्यमान भारत' म्हणत हे वेगळी दिशा पकडली. मोदींच्या तालमीत तयार होत असलेल्या मुख्यमंत्र्यांना असे काही करून दाखविता आले नाही. किंबहुना गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पाशी तुलना केली तर यावेळी मुख्यमंत्री व अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पासाठी विशेष काही मेहनत घेतली असेही दिसले नाही. गेल्या वर्षीची हिशेबवही काही किरकोळ बदल करून यावर्षी सादर करण्यात आली हे दोन वर्षाचे अर्थसंकल्प ताडून पाहिले असता लगेच ध्यानात येते. काही ठिकाणी तर वाक्यरचनाही सारखीच आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था अन्य राज्यांच्या तुलनेत मोठी असल्याने आकडे मोठे दिसतात. पण आकड्यांमध्ये फार वाढ होताना दिसत नाही, हा काळजीचा मुद्दा आहे.**



**जनतेच्या मनावर ठसावी, जनतेला किंवा जनतेमधील विशिष्ट कोणत्याही वर्गाला समाधान वाटावे अशी एकही गोष्ट या अर्थसंकल्पात नाही. गंमतीचा भाग म्हणजे तीव्र राग यावा असेही काही नाही. सर्वांना सारखी खिरापत वाटलेली आहे. मात्र त्यात कोकणासाठी हात थोडा सढळ केला आहे. अर्थसंकल्पात अनेकदा उल्लेख होण्याचे सुदैव कोकणच्या वाट्याला बहुदा पहिल्यांदाच आले असावे. अर्थात येथेही मोठी तरतूद नाही, पण अन्य विभागांच्या तुलनेत थोडा जास्त पैसा दिला गेला आहे. हे शिवसेनेच्या दबावामुळे झाले की शिवसेनेला नरम करण्यासाठी झाले असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. की नारायण राणे यांच्या पुनर्वसनाची ही तजवीज आहे? याबद्दल निश्चित मत देता येत नसले तरी ही राजकीय खेळी आहे यात शंका नाही. सरकारी खात्यांचा विचार केला तर शेतीपेक्षा शिक्षणाला अधिक तरतूद मिळाली आहे. ही चांगली गोष्ट आहे. मराठा व अन्य मोर्चांना मिळालेल्या प्रतिसादाचा हा परिणाम असावा. मात्र रोजगारवाढीसाठी ठोस योजना दिसत नाही. शिक्षणामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत, त्यासाठी उद्योगधंद्यांमध्ये भरीव तरतूद लागते. ती या अर्थसंकल्पात दिसत नाही. मॅग्नेटीक महाराष्ट्रमुळे रोजगारीचा प्रश्न चुटकीसारखा सुटेल या भ्रमात अर्थमंत्री दिसतात. रस्त्यांसाठीची तरतूद हा एक दिलासा आहे, पण त्या पलिकडे पायाभूत सोयीसुविधांसाठी भक्कम योजना नाहीत.**

# आम्ही भारतीय लोक आणि राज्यघटना




**नरेंद्र मोदी यांच्या सरकारविरुद्ध गंभीरपणे प्रचार करता येईल, असे मुद्दे विरोधकांना सापडत नसल्यामुळे त्यांनी नवीन मुद्दा काढला की, भाजप आणि संघाला राज्यघटना बदलायची आहे. केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारविरुद्ध भ्रष्टाचार, अकार्यक्षमता, मुस्लिम तुष्टीकरण, समाजातील धनिक वर्गाचेच संरक्षण अशा प्रकारचे कोणते आरोप करता येत नाहीत. पंतप्रधान मोदी तर या सर्व आरोपांच्या पलीकडे असलेली व्यक्ती आहे. मग त्यांच्याविरुद्ध रान उठवायचे असेल तर काय केले पाहिजे? हा विरोधकांपुढचा मोठा प्रश्न आहे. यासाठी त्यांनी भारतीय संविधानाला वेठीस धरले.**

एवढ्या मोठ्या आणि प्रचंड विविधता असलेल्या देशात रोज कुठे ना कुठे काही ना काही अनुचित प्रकार घडतच असतात. सत् आणि असत् अशा मनुष्याच्या दोन प्रवृत्ती असतात. सामान्य भाषेत याला आपण दैवी गुण आणि असुरी गुण असे म्हणतो. हे दोन्ही गुण मनुष्य जातीच्या जन्मापासून आहेत. मानवी संस्कृतीचा जसा विकास होत गेला, तसा मानवाच्या असुरी प्रवृत्तीला नियंत्रित करण्यासाठी अनेक प्रकारचे नियम बनत गेले. वेगवेगळे संस्कारजीवन उभे राहत गेले. राज्यसंस्था ही त्यातील एक आहे. राज्यसंस्थेचे काम कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे आहे. कायद्याप्रमाणे म्हणजे नियमांप्रमाणे समाज आपले व्यवहार करील, हे पाहणे हे राज्यसंस्थेचे काम आहे.

असे जरी असले तरी, कितीही नियम आणि कायदे केले तरी, समाजात एक प्रवृत्ती अशी राहतेच की जी अनुचित कामे करते. आताच्या काळातील सर्वात मोठे उदाहरण म्हणजे, पंजाब नॅशनल बँकेत करोडो रुपयांचा घोटाळा करणाऱ्या नीरव मोदी याचे आहे. हा झाला आर्थिक गुन्हा. अशाच प्रकारचे खुनाचे गुन्हेदेखील होतात. इंद्राणी मुखर्जीची केस ही त्या बाबतीत फार बोलकी आहे. तलवार कुटुंबातील आरुषीची हत्या हीदेखील एक अशीच घटना आहे. या घटनांना धरून समाजात काही वेळा काही गट अधिक उतावीळ होतात आणि त्यांना ज्याविषयी श्रद्धा आहे त्याविरुद्ध कोणी काही केल्यास ते कायदा हातात घेतात. अशा सर्व घटना म्हणजे, राज्यघटनेवर हल्ला मानता येत नाही. तशा प्रकारे त्याचे विश्लेषण करणे केवळ मूर्खपणाचे नसून घोर अज्ञानाचे निदर्शकदेखील आहे. हे सर्व विषय राज्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या कक्षेत येतात. ती राखण्यासाठी शासनाची प्रचंड व्यवस्था असते, त्यात पोलिस दल, गुप्त पोलिस दल, आयबी, सीबीआय अशा अनेक संस्था येतात. अशा कोणत्याही घटना घडल्या की, विरोधकांचा एक ठरलेला प्रश्न असतो - मोदी यावर का बोलत नाहीत? मोदींचे मौन का? हादेखील अत्यंत बावळट प्रश्न आहे. प्रश्न विचारणारे आणि त्यावर लेखणीतील शाई आटवणारे एकमेकांचे जुळे भाऊ शोभतात. देशात घडणाऱ्या प्रत्येक विषयावर जर पंतप्रधान भाष्य करू लागले, तर त्यांनी अन्य कामे कधी करायची? त्यांचे मुख्य काम मंत्रिमंडळाला दिशा देण्याचे, परराष्ट्रनीतीला आकार देण्याचे आणि अर्थकारणाला वेग देण्याचे आहे. सर्व विषयांवर भाष्य करत बसण्याचे नाही. हे ज्यांना समजत नाही, त्यांना आपण काय म्हणणार, अक्कलशून्य की अक्कलवंत?

आणखी काही जणांनी आपला गोड समज करून घेतला आहे की, आमचे विचार स्वातंत्र्य, आमचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य, आमचे कला स्वातंत्र्य धोक्यात येत चालले आहे. म्हणजे काय? असा प्रश्न विचारला तर त्याचे तार्किक उत्तर देताना यांची बोबडी वळेल. विचारस्वातंत्र्य नाही म्हणून बोंबाबोंब करायची, मग असा प्रश्न विचारला की, अहो तुम्ही एवढे बोंबाबोंब करता, हे तुमचे विचारस्वातंत्र्य नाही का? तुम्ही पंतप्रधानांवर वाटेल ते आरोप करता त्याबद्दल तुम्हाला अटक केली जात नाही, चौकशी होत नाही, हे विचारस्वातंत्र्य नाही का? म्हणजे आपण जे बोलतो, ते वास्तवात टिकणारे नाही, हे या लोकांच्या लक्षात येत नाही. म्हणून त्यांना पुरोगामी विद्वान म्हणायचे. काँग्रेस सरकारने या सर्वांना पोसले, पुरस्कार दिले ते आता बंद झाले त्यामुळे यांना आता असे वाटते की, आपले विचारस्वातंत्र्य गेले.

शशी थरूर यांनी 'व्हाय आय ॲम हिंदू' या नावाचे पुस्तक लिहून विचारस्वातंत्र्य म्हणजे काय असते याचे झणझणीत अंजन सर्वांच्या डोळ्यात घातले आहे. त्यांनी हिंदुत्ववाद्यांवर अत्यंत कडवट टीका केली; म्हणून कोणीही त्यांच्या पुस्तकावर बंदी घालण्याची मागणी केलेली नाही.

मी गेली चार वर्षे सेन्सॉर बोर्डाचा सदस्य आहे, आणि मी संघाचा कार्यकर्ता आहे, हे सर्वांना माहीत आहे. माझी बोर्डातील प्रतिमा अतिशय लिबरल माणूस अशी आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य इत्यादी सगळे विषय चित्रपट बघताना येतात, आणि त्यावर कोणत्याही प्रकारची कात्री लावली जाणार नाही, हे चित्रपट बघताना मी पाहत असतो. असंख्य चित्रपट माझ्या दृष्टीने चित्रपटगृहात जाऊन बघण्याच्या लायकीचेदेखील नसतात. ही झाली माझी व्यक्तिगत आवड. ती मी बाजूला ठेवतो. म्हणून विचारस्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांची नसती प्रवचने कोणी देण्याचे कारण नाही.

राज्यघटना म्हणजे काय पँट-शर्ट नव्हे किंवा स्त्री-पुरुष घालतात तो पोशाख नव्हे, की जो एक दिवस घातला की दुसऱ्या दिवशी काढून ठेवावा लागतो. राज्याच्या दृष्टीने राज्यघटना हा मूलभूत कायदा असतो. सामान्य कायदा आणि राज्यघटनेचा कायदा यात फरक आहे. सामान्य कायदा लोकनियुक्त प्रतिनिधी पारीत करतात. काही कायदे त्यातल्या परिस्थितीच्या संदर्भातले असतात. परिस्थिती बदलली की कायद्याला काही अर्थ राहत नाही. दारूबंदीसारखे कायदे लोकांना व्यसनापासून मुक्त करण्यासाठी असतात, परंतु हे कायदे जेव्हा अंमलबजावणीच्या पातळीवर अयशस्वी ठरतात तेव्हा ते बदलावे लागतात.

राज्यघटनेच्या कायद्याचे तसे नसते. हे कायदे काही मूलभूत विचारांच्या चौकटीवर उभे असतात. यातील अनेक विचार कालनिरपेक्ष असतात. या विचारांची उत्क्रांती मानवी समाजाच्या उत्क्रांतीशी जोडलेली असते. उदा. पाचशे वर्षांपूर्वीच्या स्वातंत्र्याचा अर्थ आणि आजच्या काळातील स्वातंत्र्याचा अर्थ, शब्द जरी एक असला तरी त्यामध्ये प्रचंड अंतर निर्माण झालेले आहे. हीच गोष्ट समता आणि न्याय या तत्त्वांबाबतीतदेखील आहे. आपल्या राज्यघटनेची मूलभूत चौकट स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या चार शाश्वत तत्त्वांवर उभी आहे. राज्यघटनेची विविध कलमे स्वातंत्र्य म्हणजे काय, समता म्हणजे काय, न्याय म्हणजे काय, सार्वत्रिक बंधुता कशी आणायची याचे दिशादर्शन करणारी कलमे आहेत. काही कलमे ही परिस्थिती सापेक्ष असतात. परंतु समाज हा स्थितिशील कधीच नसतो. तो सतत बदलत असतो. तंत्रज्ञान बदलते. तंत्रज्ञानाच्या बदलाचे परिणाम समाजाच्या उत्पादन पद्धतीवर होतात त्यामुळे अर्थव्यवस्था बदलते. अर्थव्यवस्था बदलली की समाजव्यवस्थेतदेखील वेगवान बदल घडू लागतात.

# १२०० आदिवासी महिलांना 'इमिटेशन ज्वेलरी' तून रोजगार

**मुंबई- कुपोषण, शारीरिक आरोग्य या पिचलेल्या परिस्थितीमधून दुर्गम डोंगराळ भागातील आदिवासी कुटुंबांना बाहेर काढायचे असेल तर, प्रथम या घरातील प्रत्येक महिलेच्या हाताला काम दिले पाहिजे असा दूरगामी विचार करून वाडा येथील 'आसमंत' स्वयंसेवी संस्थेने जव्हार, वाडा, बोईसर भागांतील आदिवासी महिलांकडून इमिटेशन ज्वेलरी (नकली दागिने) तयार करण्याचे काम सुरू केले.**

घरकाम, शेती, रोजगाराची अन्य कामे करून आदिवासी महिला घरबसल्या, 'आसमंत'च्या कार्यालयात येऊन नकली दागिने तयार करण्याचे काम करीत आहेत. सुरुवातीला २० ते २५ महिलांची असलेली ही संख्या आता १२०० वर गेली आहे. या माध्यमातून आदिवासी महिलांना रोजगार आणि त्या माध्यमातून मजुरीचा चांगला परतावा मिळू लागल्याने जव्हार तालुक्यातील २८ गावे नकली दागिने तयार करणारे व्यापारी केंद्र झाली आहेत. 'आसमंत' संस्थेच्या संचालिका निशा सवरा यांच्या प्रयत्नांतून आदिवासी महिलांना जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम करण्यात येत आहे. आदिवासी महिला, पुरुष यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देण्यासाठी (पेसा कायदा) वाड्या, पाड्यांवर संस्थेने कार्यक्रम घेतले. या माध्यमातून आदिवासी जागृत होईल; पण



त्याला रोजगाराचे साधन नसल्याने तो त्या भागातच खितपत पडेल. हा विचार करून निशा सवरा यांनी आदिवासी महिलांना त्यांची नियमित कामे करून दोन पैसे घरात बसून कमाविता येतील, असा घरगुती उद्योग सुरू करून देण्याचा निणर्य घेतला. 'जेम्स ॲण्ड ज्वेलरी स्किल कौन्सिल ऑफ इंडिया' (जिजीस्का), 'इमिटेशन ज्वेलरी ऑफ मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन'चे (इजमा) मधुभाई पारेख यांच्याशी संपर्क साधला. 'जिजीस्का'ने आदिवासी महिलांना दागिने तयार करण्याचे प्रशिक्षण द्यायचे आणि 'इजमा'ने महिलांना काम द्यायचे, या करारावर या दोन्ही संस्थांचे जव्हार तालुक्यातील कोगदा गावात दागिने तयार करण्याची कामे सुरू झाली.

# अनधिकृत इमारतींनाही नळजोडणी

**वसई-** विरार शहरातील अनधिकृत इमारतींना नवीन नळजोडण्या मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. आमदार हितेंद्र ठाकूर आणि महापौर रुपेश जाधव यांनी अनधिकृत चाळी आणि इमारतींना पाणी देणार असल्याची जाहीर भूमिका घेतली आहे. सध्या पालिकेने भोगवटा प्रमाणपत्र मिळालेल्या सर्व इमारतींना नवीन नळजोडण्या देण्यास सुरुवात केली आहे. वसई-विरार शहरात सूर्याच्या दुसऱ्या टप्प्यातील १०० दशलक्ष लिटर पाणी शहरात आले आहे. या पाण्याच्या वितरणासाठी शहरात जलवाहिन्या टाकण्याचे काम सुरू आहे, परंतु हे पाणी केवळ अधिकृत इमारतींनाच देण्याची भूमिका महापालिकेने घेतली होती. बिल्डरांनी शहरात हजारो अनधिकृत इमारती बांधल्या आहेत. त्यात बोगस सीसी वापरून, आरक्षित जागेवर अतिक्रमण



करून, परवानगी न घेता बहुमजली इमारती बांधल्या आहेत. या सर्व अनधिकृत इमारती आहेत. त्यामुळे शहरातील अनधिकृत इमारतींमध्ये आणि चाळींमध्ये राहणाऱ्या नागरिकांपुढे मोठा प्रश्न निर्माण झाला होता. त्यांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत होते. आता सूर्याच्या पाण्याच्या वितरणाचे काम सुरू आहे. त्यामुळे या अनधिकृत इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांनाही पाणी द्यावे, अशी मागणी काही नगरसेवकांनी केली होती, परंतु आयुक्तांनी अधिकृत इमारतींनाच नळजोडण्या देण्याला प्राधान्य दिले होते. अनधिकृत इमारतींपैकी काही इमारतींना घरपट्टी लावण्यात आलेली आहे, मात्र नळजोडण्या नाहीत. या इमारतीच्या रहिवाशांची नावे मतदारयादीत आहेत, परंतु त्यांना पाणी नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली होती.

# ढासळत्या 'सूर्या'तून अपुरा पाणीपुरवठा

## १० वर्षात देखभाल दुरुस्ती नाही

**कासा-** डहाणू व पालघर तालुक्यातील गावांना शेतीला उन्हाळ्यामध्ये सूर्या कालव्यांतून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, गेल्या दहा वर्षांपासून कालव्यांची दुरुस्तीच केली नसल्याने शेतीला अपुरा पाणीपुरवठा होतो. त्यामुळे त्याचा शेतीला फटका बसत आहे. कासा जवळील सूर्या नदीवर धामणी येथे ४० वर्षांपूर्वी धरण बांधण्यात आले. सिंचन हा प्रमुख उद्देश ठेऊन हे धरण बांधण्यात आले. आणि १४ हजार ५०० हेक्टर जमीन ओलिताखाली आणण्याचा हेतू होता. डहाणू तालुक्यातील तवा, पेठ, धामटने, कोल्हान, सोनाळे, खाणीव, कासा, चारोटी, सूर्यानगर, वेती, वरोती, मुरबाड, वांगर्जे, उर्से, साये, म्हसाड, दाभोण, ऐना, साखरे, घोळ, भराड,रानशेत, आदी ठिकाणी तर पालघर तालुक्यातील आंबेदा, नानीवली, बह्रहाणपूर, आकेगव्हान, चिंचारे, सोमटा, बोरशेती, कुकडे, महागाव आदी गावांना अश्या एकूण ७० ते ८० गावांना उन्हाळ्यात शेतीला पाणीपुरवठा केला जातो. शेतकरी सदर काळव्याच्या पाण्यावर उन्हाळ्यात भातशेती बरोबरच भाजीपाला, भुईमूग आदी पिके घेतात. मात्र गेल्या १० वर्षांपासून कालव्यांची दुरु स्तीच केली जात नसल्याने ठिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाण्याचा निचरा होत आहे.

काही ठिकाणी कालवे उथळ व गेट तुटल्याने पाणी वाया जाते. त्यामुळे शेवटच्या भागापर्यंत पाणी जातच नाही. कालव्यातून होणार पाण्याचा निचरा रोखण्यासाठी मुख्य



कालवे व उप कालव्यांचे सिमेंटने बांधकाम केले होते. मात्र, वेळोवेळी दुरु स्ती व सफाई न केल्याने बह्रयाच ठिकाणी कालव्याचे बांधकाम, प्लॅस्टर वाहून व तुटून गेले आहेत. सारणी, उर्से म्हसाड, आंबिवली, साये, घोळ, भराड , आदी ठिकाणी तर कालव्यांचे पूर्ण बांधकाम व प्लॅस्टर तुटून गेले आहे. तर पेठ, धामटने, घोळ, नानिवली, चिंचारे, आदी ठिकाणी तर कालव्याचे शेतीला पाणीपुरवठा करणारे गेट नादुरुस्त झाले आहेत तर काही ठिकाणी तुटून गेले आहेत.

# डहाणू-विरार ५ वर्षात ६१३ बळी, ट्रॅक ओलांडणे, दारातून पडणे बेतते जीवावर

**पालघर-** डहाणू-विरार दरम्यान रेल्वेने प्रवास करणाह्रया प्रवाशांच्या वाढत्या गर्दीमुळे गेल्या ५ वर्षात वेगवेगळ्या अपघातात ६१३ जणांचा बळी गेला आहे. वसई-विरारची लोकसंख्या वाढल्यामुळे इथला वर्ग पालघर, डहाणूकडे स्थलांतरीत होत आहे. पश्चिम रेल्वेने डहाणूपर्यंतच्या सेवेला उपनगरीय दर्जा दिला असला तरी गाड्यांच्या संख्येत पुरेशी वाढ न झाल्याने इथल्या प्रवाशांना आता ट्रेन च्या दरवाज्यात लटकून प्रवास करावा लागतो आहे. डहाणू-विरार दरम्यानच्या वाढत्या गर्दीमुळे हे अपघाती मृत्यू झाले असून हे अपघात रोखण्यासाठी रेल्वे प्रशासन कोणतीही उपाययोजना करीत नाही. गेली अनेक वर्षे येथील सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते, प्रवासी संघटना व येथील प्रशासन प्रवाशांच्या सोयी सुविधांमध्ये वाढ घडवून आणण्याबाबत सतत पत्रव्यवहार करीत आहेत. मात्र रेल्वे प्रशासनाकडून कुठलाही सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही. इथल्या प्रवाशांच्या समस्या दूर कराव्यात अशी मागणी येथे यानिमित्ताने होत आहे. मुंबईतील महागडी घरे परवडत नसल्याने सर्वसामान्यांनी वसई-विरारला पसंती देऊन स्वस्त घरासाठी तो पर्याय निवडला. मात्र येथेही घरांचे भाव वाढत चालल्याने तसेच गर्दी प्रचंड वाढल्याने नागरिकांनी स्वस्त घरासाठी



पालघर, बोईसर, डहाणूची निवड केली. येथील वाढते औद्योगिकीकरण, नागरीकरण यामुळे रेल्वेमधील गर्दी पूर्वीपेक्षा दुपटीने वाढू लागली. हा नागरीकरणाचा विस्तार येथील रेल्वे सेवांच्या मानाने मोठा असल्याने येथील अपघातात होणारे हे मृत्यू या मागचे कारण असल्याचे सांगण्यात येत आहे. यातील बहुसंख्य बळी हे प्रवास करतांना खाली पडणे, लोहमार्ग ओलांडत असतांना धडक बसणे, दरवाजाला लोंबकळून प्रवास करतांना पोलचा फटका बसून खाली पडणे.

# मीरा-भाईंदरमधील अबोली रिक्षांचे वाटप कागदावरच!

**भाईंदर-** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मीरा-भाईंदर महानगरपालिकेने शहरातील आठ गरजू महिलांना अबोली रंगाच्या रिक्षा देण्यात आल्या, मात्र रिक्षा मिळाल्याचा आनंद या महिलांना झाला असला तरी त्या प्रत्यक्ष ताब्यात येण्यास अजूनही काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे सध्या या रिक्षा महानगरपालिकेच्या आवारातच उभ्या करून ठेवण्यात आल्या आहेत. मीरा-भाईंदरमधील गरजू, विधवा महिलांना आपल्या पायावर उभे राहता यावे यासाठी महिला बालकल्याण समितीच्या माध्यमातून १०० महिलांना अबोली रिक्षा देण्याची योजना जाहीर करण्यात आली होती. त्यानुसार महिलांना रिक्षा चालवण्याचे प्रशिक्षणही देण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात आठ महिलांनी प्रशिक्षण पूर्ण



केल्याने त्यांना रिक्षा देण्याचे नक्की करण्यात आले. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून गुरुवारी जाहीर समारंभात या रिक्षा महिलांना प्रदान करण्यात आल्या. रोजगारासाठी उत्पन्नाचे साधन मिळाल्याचा आनंद या महिलांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसून येत होता. मात्र या रिक्षा महिलांच्या ताब्यात यायला अद्याप काही दिवस लागणार आहे. कागदपत्रांची पूर्तता अद्याप झाली नसल्याने सध्या रिक्षा महिलांकडून परत घेण्यात आल्या असून त्या महापालिकेच्या आवारातच उभ्या करून ठेवण्यात आल्या आहेत.

व्यवसाय करण्यासाठी रिक्षा रस्त्यावर उतरविण्याआधी त्यांची प्रादेशिक परिवहन विभागाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. ही नोंदणी अद्याप झालेली नाही.

# आईसह १४ वर्षीय मुलाने दोन सशस्त्र चोरट्यांना दिले पकडून

**वसई (पालघर)-** घरात शिरलेल्या दोन सशस्त्र चोरट्यांना पकडण्याचे धाडस एका १४ वर्षीय मुलाने आपल्या आईच्या मदतीने दाखवल्याची घटना नालासोपारा शहरात घडली आहे. नालासोपारा पश्चिमेकडील पाटणकर पार्क येथील तुस्कान टॉवरमध्ये राहणाह्रया रेखा सालियन या बुधवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास मुलाला शाळेतून घरी आणण्यासाठी गेल्या होत्या. अर्ध्या तासाने परतल्यावर त्यांना घराचे कुलुप तुटलेल्या अवस्थेत दिसले. त्यांनी दबक्या पावलाने मुलासह घरात प्रवेश केला. त्यावेळी घरात तिघे हातात शस्त्रे घेऊन उभे असल्याचे त्यांना दिसले. चोरट्यांनी दोघांनाही शस्त्राचा धाक दाखवून गप्प बसण्यास सांगितले. काही वेळ गर्भगळीत झालेल्या रेखा सालियन हिंमत दाखवत सशस्त्र चोरट्यांना सामोह्रया गेल्या. चोरट्यांना त्या विरोध करीत असल्याचे पाहून त्यांचा चौदा वर्षांचा मुलगाही मदतीला धावून आला. अचानक झालेल्या प्रतिकाराने तिन्ही चोरटे घाबरून गेले. संधी साधत आई आणि मुलाने एका चोरट्याला पकडून ठेवले. तसेच आरडाओरड करून मदतीसाठी धावा केला.



# बलात्कार केल्यास फाशी, राजस्थानात नवा कायदा मंजूर

जयपूर- मध्य प्रदेश आणि हरियाणा यांच्यानंतर आता राजस्थान सरकारने बलात्कारप्रकरणी कडक पावले उचलले आहे. राजस्थानमधील मुख्यमंत्री वसुंधराराजे शिंदे सरकारने बलात्कार केल्यास फाशीची शिक्षा असणारे कायदा बिल मंजूर केलेय. हे बिल आता राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे.

बारा वर्षाच्या खालील मुलीवर बलात्कार करणाऱ्यास फाशीची शिक्षा देण्याचा कायदा आज शुक्रवारी राजस्थान विधानसभेमध्ये मंजूर करण्यात आलाय. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये मध्य प्रदेश हे अशा प्रकारचा कायदा करण्यात आला. गेल्या महिन्यात हरियाणा सरकारच्या विधानसभेमध्येही हा कायदा पास करण्यात आला. राजस्थानात इंडियन पीनल कोडमध्ये ३७६ – एए या कलमाची भर टाकण्यात आली आहे. त्यात स्पष्ट केले आहे की, बारा वर्षापर्यंतच्या महिलेवर बलात्कार केल्यास त्या गुन्हेगाराला मृत्यूदंडाची किंवा किमान १४ वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात येईल. तुरुंगवासाची शिक्षा, जन्मठेपेपर्यंत म्हणजे व्यक्ती नैसर्गिकरीत्या मरण पावेपर्यंत वाढवता येईल. शिवाय आरोपीला दंडही ठोठावता येईल.

तसेच सामूहिक बलात्काराच्या गुन्ह्यासाठी ३७६ – डीडी या कलमाचीही भर टाकण्यात येणार आहे. या विधेयकामागची कारण मीमांसा करताना राज्य सरकारने नमूद केलेय. सगळीकडे बालकांवर बलात्कार आणि सामूहिक बलात्कार करण्याचे प्रमाण वाढत आहे. याला आळा बसला पाहिजे. असे घृणास्पद प्रकार होता कामा नये म्हणून हा कायदा करण्यात आलाय.



# राज्यसभेसाठी राणे राजी, खडसे यांनाही भाजपची गळ


**मुंबई-** भाजपतर्फे राज्यसभेच्या तीन जागांपैकी एका जागेसाठी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर यांनी शुक्रवारी अर्ज भरला. दुसऱ्या जागेसाठी महाराष्ट्र स्वाभिमान पक्षाचे नेते नारायण राणे अखेर अर्ज भरण्यास तयार झाल्याचे समजते. त्याचबरोबर तिसऱ्या जागेसाठी भाजपने ज्येष्ठ नेते व माजी मंत्री एकनाथ खडसे यांना गळ घातल्याचे वृत्त आहे.

महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सहा जागा रिक्त होत असून त्यासाठी निवडणूक जाहीर झाली आहे. भाजपच्या वाटय़ाला संख्याबळानुसार तीन जागा येत आहेत. त्यापैकी एका जागेसाठी केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री प्रकाश जावडेकर यांनी शुक्रवारी



अर्ज भरला. राज्यसभेवर जाण्यास राणे नाखूश होते. त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना भेटून तशी भावनाही व्यक्त केली होती. राज्य मंत्रिमंडळात येण्यास राणे इच्छुक होते. मात्र राज्यसभा वगळता इतर पर्याय शक्य नसल्याचे राणे यांना कळवण्यात आले. त्यामुळे आता दुसरा मार्ग नसल्याने राणे राज्यसभेसाठी तयार झाल्याचे वृत्त आहे. त्याचबरोबर तिसऱ्या जागेसाठी भाजपने ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांच्याकडे विचारणा केली. खडसे हे राज्यातच राहण्यास इच्छुक आहेत. खडसे यांनी पक्षाकडे राज्यसभेवर जाण्याची इच्छा नसल्याचे स्पष्ट केले होते. याबाबत विचारणा करता, पक्षाने जर आदेश दिला तर त्याबाबत विचार करता येईल, असे एकनाथ खडसे यांनी सांगितले.

# ‘दीरासोबत शारीरिक संबध ठेवण्यास शमी दबाव टाकायचा’



**नवी दिल्ली-** हिंदुस्थान क्रिकेट संघाचा जलद गोलंदाज मोहम्मद शमीच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. पत्नी हसीन जहाने शमीवर गंभीर आरोप केले आहेत. एका इंग्रजी वेबसाईटशी बोलताना हसीनने आरोप केला की, ‘शमी त्याच्या लहान भावासोबत शारीरिक संबध ठेवण्यासाठी माझ्यावर दबाव टाकत असे’. याशिवाय शमीचे अनेक मुलींशी संबध असल्याचेही हसीनने यावेळी पुन्हा सांगितले.

याप्रकरणात शमीवर आरोपांची यादीमध्ये दररोज वाढ होत आहे. हसीनने एक पाऊल पुढे जात शमीविरोधात कोलकात्याच्या बाजार पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल केला आहे. एफआयआरमध्ये हसीनने शमीसह ४ जणांवर गंभीर आरोप केले आहेत. या सर्वांवर हुंडाबळी, घरगुती हिंसाचार, हत्येचा प्रयत्न, धमकी आणि कटकारस्थान असे आरोप तिने केले आहेत.

# ज्यांनी मत नाही दिलं त्यांचही सरकार -नरेंद्र मोदी



**आगरतळा :** त्रिपुरामध्ये ३ मार्चला निवडणुक निकाल आले आणि भाजपाचा झेंडा फडकला. पंतप्रधानांनी आगरतळा येथे नव्या सरकारच्या शपथविधी समारंभात नवा संदेश दिलाय. ‘सबका साथ सबका विकास’ या आपल्या नाऱ्याची त्यांनी पुन्हा आठवण करुन दिली. तामीळनाडूतल्या पेरियार यांच्या पुतळ्याची विटंबना करण्याचा प्रयत्न झाला. तिकडे पश्चिम बंगालमध्ये कोलकात्याच्या जाधोपुरू विद्यापिठातील शामा प्रसाद मुखर्जींच्या पुतळ्याचाही विटंबना करण्यात आली. त्रिपुरात लेनिनचा पुतळा पाडण्याचा घटनेचा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तीव्र शब्दात निषेध केलाय. याप्रकरणी मोदींनी केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांच्या चर्चा करून परिस्थितीची माहिती घेतली. अशी कृत्य करणाऱ्यांविरोधात कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आल्याचं सूत्रांनी म्हटलंय. त्रिपुरात अभूतपूर्व विजयानंतर काही भाजप कार्यकर्त्यांनी लेनिनचा पुतळा बुलडोझरच्या मदतीनं हटवला होता. कार्यकर्त्यांच्या याकृत्याविरोधात देशभरात संतापाची लाट उठलीय. त्याचे पडसादही उमटू लागले आहेत.

पंतप्रधान मोदींनी स्पष्ट शब्दात सांगितले की, ज्यांनी आम्हाला मत दिलं त्यांचही सरकार आहे आणि ज्यांनी मत नाही दिल त्यांचही सरकार आहे. राज्यात हिंसेला स्थान नाही. मंचावर बसलेल्या नवनिर्वाचित मुख्यमंत्री बिप्लब देव यांच्यासहित त्यांच्या सरकारमधील सर्व मंत्र्यांना मोदींनी हा संदेश दिलाय.

# मुस्लिमांना आरक्षण घटनाविरोधी -केंद्र सरकार

**नवी दिल्ली-** मुस्लिमांना आरक्षण देणे हे घटनाविरोधी असल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. त्यामुळे मुस्लिमांना १२ टक्के आरक्षण देण्याचा तेलंगाणा राज्य सरकारचा प्रस्तावही केंद्र सरकारने नाकारला आहे. केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी राज्यसभेत उत्तर देताना एका उत्तरात हे स्पष्टीकरण दिले आहे. तेलुगु देसम पक्षाचे खासदार देवेंदर गौड यांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना अहीर यांनी हे वक्तव्य केले. अशा प्रकारे आरक्षण देणे हे घटनाविरोधी असून त्यामुळे या संबंधातील विधेयक स्पष्टीकरणासाठी तेलंगाणा राज्य सरकारकडे परत पाठवले आहे, असे अहीर यांनी सांगितले.



राज्यघटनेच्या कलम १६ (४) अंतर्गत आरक्षण देण्याची तरतूद आहे, परंतु लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देण्याची तरतूद नाही, असे अहीर यांनी सांगितले.

मुस्लिमांना आरक्षण देण्याचे प्रयत्न तेलंगाणा सरकारने चालवले आहेत. त्यासाठी आरक्षणाचे अधिकार राज्य सरकारला देण्याची मागणी तेलंगाणा राष्ट्र समिती पक्षाच्या खासदारांनी केली आहे. केंद्र सरकारने हा प्रस्ताव नाकारला तर सर्वोच्च न्यायालयात दाद मागू, असे तेलंगाणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता तेलंगाणा सरकारची खरी कसोटी लागणार आहे.

## एकवर्षीय बाळाला आईने चालत्या बसमधून फेकले

**बीड / परळी-** बार्शी येथील साखर कारखान्याकडे बसने निघालेल्या ऊसतोड कामगार महिलेने भर दुपारी रणरणत्या उन्हात बसच्या खिडकीतून पोटच्या एका वर्षाच्या बाळाला फेकून दिले. सोबत असलेल्या दीर व जावेने आरडाओरड करून बस थांबवत रस्त्यावर पडलेल्या पुतण्याला कवेत घेतले. याचवेळी परळीकडे जाणाऱ्या रुग्णवाहिकेतून बाळाला परळीत दाखल केले. बाळावर प्रथम परळी व नंतर अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात उपचार करण्यात आले. या प्रकरणी ऊसतोड कामगार महिलेच्या दिराने पोलिसांना जबाब दिला असून वेडाच्या भरात भावजईने हे कृत्य केल्याचे म्हटले आहे. ही घटना परळी जवळील कन्हेरवाडी घाटात शुक्रवारी दुपारी साडेबारा वाजता घडली.

## अर्थसंकल्पात सातव्या वेतन आयोगाची घोषणा नाहीच

**मुंबई-** राज्य सरकारकडून या वर्षी सातव्या वेतन आयोगाची घोषणा होईल, अशी शक्यता नोकरदारांना वाटत होती. मात्र या २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाच्या राज्याच्या अर्थसंकल्पातही सातव्या वेतन आयोगाची घोषणा करण्यात आली नाही. यामुळे तुर्तास तरी राज्याच्या १२ लाख कर्मचाऱ्यांची निराशा झाली आहे. बक्षी आयोगाच्या अहवालानंतर सातव्या वेतन आयोगाची घोषणा केली जाणार असल्याचं अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटलं आहे. यावर्षी सातव्या वेतन आयोगाची घोषणा होईल असं म्हटलं जात असताना, या वर्षी सातव्या वेतन आयोगाला तुर्तास तरी राज्य सरकारने ब्रेक लावला आहे.

# विदर्भातील संत्री निर्यातवाढीचे उद्दिष्ट अद्याप अपूर्ण

**नागपूर-** महाराष्ट्रातून संत्री कृषी निर्यात क्षेत्राच्या माध्यमातून पाच वर्षांमध्ये संत्र्यांची निर्यात १० हजार मेट्रिक टनाने वाढवण्याचे राज्य सरकारचे उद्दिष्ट अजूनही विविध कारणांमुळे पूर्ण होऊ शकलेले नाही. सरकारच्या प्रोत्साहनाअभावी संत्र्यांची निर्यात १० टक्क्यांवर स्थिरावल्याचे चित्र आहे. यंदा आतापर्यंत केवळ ३३.८६ मे. टन संत्र्याची निर्यात झाली असून २०१६-१७ मध्ये ७८८ मे.टन संत्र्याची निर्यात झाली होती.

देशात संत्री उत्पादनामध्ये काही वर्षांपुर्वी अव्वल असणारा महाराष्ट्र आता मागे पडला असून राज्याची चौथ्या क्रमांकावर घसरण झाली आहे. कमी उत्पादकता हे त्याचे कारण मानले जात आहे. पंजाब सारख्या राज्याने ‘किन्नो’च्या उत्पादनात प्रति हेक्टरी २१.२ मे.टन एवढी झेप घेतली असताना महाराष्ट्र उत्पादकतेच्या बाबतीत शेवटच्या स्थानी आहे. राज्याची उत्पादकता केवळ ३.९ मे.टन प्रति हेक्टर आहे. राज्यात



देशातील संत्री उत्पादनाच्या २० टक्के उत्पादन घेतले जाते. सध्या राज्यात १ लाख ०८ हजार हेक्टर क्षेत्रात संत्र्याच्या बागा आहेत. एकूण लागवडीपैकी सर्वाधिक क्षेत्र अमरावती आणि नागपूर या जिल्ह्यंमध्ये असल्याने या दोन जिल्ह्यत संत्री कृषी निर्यात क्षेत्राची स्थापना करण्यात आली. ही निर्यातवाढ सिंगापूर, हाँगकाँग, आखातातील देश, आणि बांग्लादेशात होईल, अशी शक्यता वर्तवण्यात येत होती. संत्री निर्यात क्षेत्रांतर्गत कोटय़वधी रुपयांची गुंतवणूक होईल, असे स्वप्न रंगवण्यात आले, उत्पादन आणि उत्पादकता वाढवण्यासाठी त्याचा फायदा होईल, असे सांगितले गेले, पण अजूनही निर्यात सुविधांच्या बाबतीत संत्री उत्पादक शेतकऱ्यांचा व्यवस्थेशी संघर्ष सुरूच आहे. काही प्रयोगशील शेतकरी स्वत:हून निर्यातीसाठी प्रयत्न करीत आहेत.

# पोलीस हवालदाराकडून पोलीस महिलेचा विनयभंग

**मुंबई - रोडरोमियोप्रमाणे पाठलाग करीत भररस्त्यात हात पकडून पोलीस हवालादाराने महिला पोलीस शिपायाचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना मलबार हिल येथे उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलीस हवालदार अफसल मुलानीविरुद्ध पोलिसांनी विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.**



तक्रारदार महिला पोलीस मुंबई पोलीस दलात कार्यरत आहे. तिने केलेल्या तक्रारीनुसार, गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात ती त्वचा विकारासंबंधी डॉक्टरच्या शोधात होती. त्याच दरम्यान तिच्या सहकाड्ड्याने मुलानीसोबत तिची ओळख करुन दिली. मुलानीच्या ओळखीने तिने एका डॉक्टरकडे उपचार सुरू केले. त्यानंतर मुलानी तिच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करत होता. सुरुवातीला तिने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर त्याने तिला चहासाठी ऑफर केली. त्यानंतर एकदा शर्ट खरेदी करण्यासाठी सोबत येण्याची विनंती केली. त्यानंतर त्याचे फोन सुरु झाले. तो रोज मेसेज करु लागला. तिने याबाबत त्याला सुनावूनही तो गप्प राहात नव्हता.

अशातच नोव्हेंबरमध्ये त्याने भररस्त्यात तिचा हात पकडला आणि ‘आय लव्ह यू’ म्हटले. त्याला नकार देत ती तेथून निघून गेली. महिन्याभराने त्याने तिची माफी मागितली आणि पुन्हा असे करणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर त्याचे शुभसकाळचे संदेश येणे सुरू झाले. याच दरम्यान त्याने तिला कॉल करुन एका बीट चौकीच्या रुममध्ये बोलावले. त्यामुळे तिने त्याच्याशी बोलणे बंद केले. मुलानीच्या संदेशांकडेही दुर्लक्ष केले. याच रागात तो आणखी त्रास देऊ लागला. तसेच पोलीस दलात बदनामी करण्याची धमकीही देऊ लागल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# वाय-फाय बंद केला म्हणून बायकोला मारहाण!

नवऱ्याने झोपावे म्हणून वाय-फाय बंद करणाऱ्या बायकोला नवऱ्याने प्रचंड मारहाण करण्याची घटना हैद्राबादेत घडली आहे. या संबंधात स्थानिक पोलिसांनी तक्रार नोंदवून घेतली आहे.

रेश्मा सुलताना असे या महिलेचे नाव आहे. बुधवारी मध्यरात्र उलटून गेल्यावरही इंटरनेटवर सर्फ करत होता. तेव्हा तिने घरातील वाय-फाय कनेक्शन बंद केले. तेव्हा तिचा नवरा ओमर पाशा संतप्त झाला आणि त्याने तिला मारहाण केली. तिच्या छातीवर, चेहऱ्यावर आणि डोक्यावर जखमा झाल्या आहेत, असे रेश्माच्या आईने नोंदविलेल्या तक्रारीत म्हटले आहे. रेश्माला एका खासगी रुग्णालयात तिच्यावर उपचार चालू आहेत. या जोडप्याचे लग्न सहा वर्षांपूर्वी झाले असून त्यांना तीन मुली आहेत. ही कौटुंबिक भांडणाची घटना असल्याने नातेवाईक दोघांमध्ये समेट घडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. जर हे प्रयत्न अयशस्वी ठरले, तर हे प्रकरण समुपदेशनसाठी हिला पोलीस स्थानकाकडे सोपविण्यात येईल आणि त्यानंतर गरज पडल्यास गुन्हा नोंदविण्यात येईल, असे पंजागुटा स्थानकाचे पोलीस निरीक्षक एस. रविंद्र यांनी सांगितले.

# शस्त्रक्रियेविनाही गर्भाशयाच्या कर्करोगावर उपचार शक्य

**मुंबई - गर्भाशयाच्या कर्करोगावरील उपचारांबाबत टाटा मेमेरिअल रुग्णालयाने महत्त्वाचे संशोधन केले आहे. त्यानुसार, या उपचारांकरिता अपवादात्मक प्रकरणांमध्ये शस्त्रक्रियेची गरज नसल्याचे तज्ज्ञांनी म्हटले आहे. या संशोधनाविषयी नुकताच एक अहवाल तज्ज्ञांनी सादर केला आहे.**



टाटा रुग्णालयातील तज्ज्ञांनी उपचारांकरिता रुग्णालयात दाखल होणाड्ड्या महिला रुग्णांच्या केसस्टडीचा अभ्यास केला. त्यात असे दिसले की, स्टेज-२ पर्यंतच्या कर्करोगांच्या प्रकरणांत केमोथेरपी आणि नंतर त्याचसोबत रेडिएशन या पद्धतीचा वापर करून रुग्णावर चांगल्या पद्धतीने उपचार केले जातात. पहिल्यांदाच डॉक्टरांनी संशोधनासाठी या दोन वेगवेगळ्या उपचार पद्धतींचा एकत्रित अभ्यास केला. डॉ. श्याम श्रीवास्तव आणि डॉ. उमेश महानशेट्टी यांनीदेखील जामा ऑन्कोलॉजी या जर्नलमध्ये आपल्या संशोधनाबाबत माहिती दिली आहे.

संशोधनाविषयी टाटा रुग्णालयाच्या डॉ. सुदीप गुप्ता यांनी सांगितले की, गर्भाशयाच्या कर्करोगावर कोणत्या पद्धतीने उपचार करावेत, याबाबत डॉक्टरांमध्ये मत-मतांतरे आहेत. काही डॉक्टर केमोथेरपी आणि रेडिएशन पद्धतीवर भर देतात, तर काही डॉक्टर केमोथेरपी आणि शस्त्रक्रिया या पद्धतीवर विश्वास ठेवतात. पण कोणत्या पद्धतीमुळे रुग्णांना सर्वात जास्त लाभ मिळेल. याबाबत काहीच निश्चित नाही.






हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)